लोकमत

# सीईओंकडून झाडाझडती; कर्मचारी अलर्ट

**वाशिम :** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी २६ फेब्रुवारीला सकाळी ९:४५ ते १० या वेळेत जिल्हा परिषदेच्या विविध विभागांना अचानक भेटी देऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची नोंद घेतली.



जिल्हा परिषदेत समाजकल्याण, महिला व बालकल्याण, पंचायत, लेखा व वित्त, बांधकाम, आरोग्य, जिल्हा स्वच्छता मिशन, ग्रामीण पाणीपुरवठा, रोजगार हमी योजना, पशुसंवर्धन, जलसंधारण, कृषी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, यांत्रिकी असे १५ विभाग आहेत. पाच दिवसांचा आठवडा असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यालयीन वेळ सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:१५ अशी आहे. अधिकारी, कर्मचारी वेळेवर कार्यालयात येतात की नाही, याची पडताळणी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी वाघमारे यांनी सोमवारी सकाळी ९:४५ वाजल्यापासून समाजकल्याण, बांधकाम, जलसंधारण, ग्रामीण पाणीपुरवठा, स्वच्छता मिशन यांसह अन्य विभागांना भेटी दिल्या. लेटलतिफ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश संबंधित विभाग प्रमुखांना दिले.


जे. एम. साहू
प्रकल्प संचालक
जिल्हा परिषद वाशिम